प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

मार्च 20, 2019

**दि महिला विकास को-ऑपरेटिव बँक लि., अहमदाबाद (गुजरात) (अनुसूचित नसलेली युसीबी) हयांचेवर आर्थिक दंड लागु**

बँकिंग विनियामक अधिनियम 1949(सहकारी संस्थांना लागू असणे) च्या कलम 46(4) सह वाचित कलम 47अ(1) खाली देण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन भारतीय रिझर्व बँकेने, दि महिला विकास को-ऑपरेटिव बँक लि., अहमदाबाद (गुजरात) (अनुसूचित नसलेली युसीबी) हयांचेवर रु.10.00 लाख (रुपये दहा लाख) दंड लागु केला असून, हा दंड, अप्रतिभूतित अग्रिम राशींवरील मर्यादा, संचालक, त्यांचे नातेवाईक व त्यांचे हितसंबंध असलेल्या कंपन्या/संस्था हयांना दिलेली कर्जे/अग्रिम राशी, आणि केवायसी/एएमएल हयावर आरबीआयने दिलेल्या सूचना/मार्गदर्शक तत्वे हयांचे उल्लंघन केले गेले असल्याने लावण्यात आला आहे.

भारतीय रिझर्व बँकेने वरील बँकेला एक कारणे दाखवा नोटिस (एससीएन) पाठविली होती व त्यावर त्या बँकेने तिचे लेखी उत्तर सादर केले होते आणि भारतीय रिझर्व बँक अहमदाबाद येथे वरिष्ठ अधिका-यांच्या समितीसमोर वैय्यक्तिक सादरीकरणही केले होते. हया प्रकरणातील सत्य व वरील बँकेने दिलेले उत्तर विचारात घेऊन भारतीय रिझर्व बँकेने निष्कर्ष काढला की उल्लंघने सिध्द होत असून त्यासाठी दंड लावणे आवश्यक आहे.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2018-2019/2249**